दि.दावा क्र.१६१/१२
नि.क्र. ६९ खाली

**<u>वादीचे साक्षदार क. १ चा सर तपास ॲड. श्री एस.एस.नाकाडे यांचेमार्फत :-</u>**

आता मला माझे सर तपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविले. ते माझया सांगण्याप्रमाणे लिहीलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

**मी खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केलेले आहे :-**

१. दावा मिळकतीचे एकुण आठ ७/१२ उतारे याकामी दाखल केलेले आहेत. **ते नि.क. ८५ ते ९२** वर आहेत.

२. याकामी फेरफार क्र. ५६ व फेरफार नोंद क्रमांक ३८ दाखल केले आहेत. ते **नि.क्र. ९३ व ९४** कडे आहेत.

३. याकामी एकुण **तीन अधिकार अभिलेख पंजी** दाखल केल्या आहेत. त्या **नि.क. ९५ ते ९७** वर आहेत.

४. प्रतिवादीला दि. ३.१.२००५ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठवली होती . मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझया वकीलांची सही आहे. सदर **नोटीस नि.क. ९८** वर आहे.

५. नोटीस पोस्टाने पाठवली त्याबाबत **पावती** जोडली आहे० ती नि.क्र. **९९** वर आहे व प्रतिवादीला नोटीस मिळाली याबाबत **पोचपावती** आली आहे. ती **नि.क्र. १००** वर आहे.

६. प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ४ यांना मिळकत विकली आहे. सदर **खरेदी खताची सर्टीफाईड नक्कल** दाखल केली आहे. ती **निक्र. १०१** वर आहे.

७. मिळकतीचे एकुण **तीन हिस्सा फॉर्म** दाखल केलेले आहेत. ते **निक्र. १०२ ते १०४** वर आहेत.

८. त्याचप्रमाणे मिळकतीचा **एकत्रीकरणाचा उतारा** दाखल केला आहे.

तो **नि.क. १०५** वर आहे.

९. मौजा पारडगाव येथील मिळकतींचे तलाठी व एकत्रीकरण अधिका-याने दिलेले **नकाशे** दाखल केलेले आहेत. ते निक्र.. **१०६ व १०७** वर आहेत.

**उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

वा.दा.ब.अ.क.केले.
समक्ष,

(एस.व्ही. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
उमरेड.
दि.३.७.१७